# Dacoits arrested by Songir PS

| | |
|---|---|
| Songir Police detected Cr. No. 119/2015 u/s. 395, 397 of IPC with Arms Act 3/25, and arrested two suspected persons and disclosed names of 8 others. | (newspaper clipping, transcribed below) |

## लामकानीतील दरोडा; पुण्यातून चौघांना अटक

- आरोपींनी पोलिसांना दिली दरोड्याची कबुली
- सोमवारपर्यंत देण्यात आली पोलिस कोठडी

प्रतिनिधी | धुळे

धनत्रयोदशीच्या दिवशी तालुक्यातील लामकानी येथे अनिल बाफना या सराफाकडे पडलेल्या दरोड्याप्रकरणी पुणे जिल्ह्यातील तळेगाव-दाभाडी येथील चार आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांना सोमवार (दि.७) पर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे. या घटनेला महिना उलटूनही तपासाची दिशा सापडत नव्हती. मात्र, पोलिसांनी आरोपींना पकडून मोठे यश मिळवले असल्याचे मानले जात आहे.

९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास लामकानी (ता. धुळे) गावात बाफना ज्वेलर्सचे मालक अनिल उत्तमचंद बाफना हे दुकान बंद करून सोन्या-चांदीचे दागिने चार पिशव्यांमध्ये ठेवून मारुती व्हॅन (क्र. एमएच १८-एम ५०२६) ने घरी येत असताना चार मोटारसायकलवर आलेल्या आठ जणांनी त्यांच्यावर हल्ला करीत त्यांच्याकडील दागिने लुटल्याचा प्रकार घडला होता. त्यात एकूण ८ लाख ७० हजार रुपयांची लूट करण्यात आली होती. याप्रकरणी सोनगीर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेनंतर दरोडेखोर दुचाकी शिंदखेडा तालुक्यातील धांदरणे शिवारात सोडून प्रसार झाले होते. त्याच्या क्रमांकावरून आरोपी पुणे, रायगड जिल्ह्यातील असल्याचा संशय व्यक्त केला जात होता. मात्र, तपासात या ठिकाणाहून दुचाकी चोरी झाल्याचे स्पष्ट झाले होते. मात्र, महिनाभरापासून आरोपींबद्दल कोणतेही धागेदोरे हाती लागत नव्हते. त्याचा तपास गेल्याच आठवड्यात डीवायएसपी नीलेश सोनवणे यांच्याकडे सोपवण्यात आला होता. यासंदर्भात पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर सोनगीर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक धनंजय पाटील यांनी त्याची कल्पना अप्पर पोलिस निरीक्षक चंद्रकांत गवळी, डीवायएसपीं नीलेश सोनवणे यांना दिली. त्यांच्या मार्गदर्शनानुसार पोसई चातुरे, प्रकाश माळी, सदेसिंग चव्हाण यांचे पथक पुणे येथे तपासासाठी गेले. त्यांनी पुणे एलसीबीच्या मदतीने तळेगाव दाभाडी एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आंबी गाव शिवारातील मोहन मन्नू उजडावत (३०, रा. आंबी ता. मावळ), विष्णू फुला मन्नावत उर्फ राठोड (३०, रा. नांजरा सुपा ता. जेजुरी), पुरुषोत्तम लाल राठोड उर्फ मन्नावत (२५, रा.आंबी), पुतर रामदास उर्फ आसमान्या राठोड (२२, रा. आंबी) यांना ताब्यात घेतले. त्यांनी बाफना ज्वेलर्सकडे दरोडा टाकल्याची कबुली दिली. त्यांना न दि. ७ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

### सोने व अन्य फरारींचा शोध

या दरोड्यात लुटण्यात आलेल्या सोन्याची संबंधितांकडून कुठे विक्री करण्यात आली आणि अन्य फरार आरोपींचा शोध पोलिसांकडून घेण्यात येत आहे. त्याबाबत अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून माहिती घेऊन तपास करण्याचा प्रयत्न पोलिसांकडून आता करण्यात येत आहे.